# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दूरध्वनी क्रमांक 02472-227301
Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.

4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 05 एप्रिल 2021, दि. 06 एप्रिल 2021, दि. 07 एप्रिल 2021, दि. 14 एप्रिल 2021, दि. 16 एप्रिल 2021 व दि. 20 एप्रिल 2021.

5. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 21 एप्रिल 2021.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांकः- 22/04/2021.

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 5 अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड 19 या विषाणूच्या संसर्गाची साखळी तोडण्याच्या अनुषंगाने दि. 22 एप्रिल 2021 रोजी रात्री 08.00 वाजेपासून दि. 01 मे 2021 रोजी सकाळी 07.00 वाजेपर्यंतच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 अन्वये व फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 मधील तरतुदींनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. 5 च्या आदेशान्वये दिलेल्या **मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन संपूर्ण उस्मानाबाद जिल्ह्यात दि. 22 एप्रिल 2021 रोजी रात्री 08.00 वाजेपासून दि. 01 मे 2021 रोजी सकाळी 07.00 वाजेपर्यंतच्या कालावधीत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत आदेशित करीत आहे.**

**A. कार्यालयीन उपस्थिती (Office Attendance):-**

a) कोविड-19 साथरोगाच्या व्यवस्थापनाशी संबंधित असलेल्या अतितातडीच्या सेवा वगळता उर्वरित सर्व (राज्य शासन, केंद्र सरकार, स्थानिक प्राधिकरणांच्या अधिपत्याखालील) शासकीय कार्यालये 15 % उपस्थितीमध्ये सुरु राहतील. शासकीय कार्यालयाचे कार्यालयप्रमुखांना 15 % पेक्षा अधिक उपस्थिती ठेवावयाची असल्यास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल.

b) या कार्यालयाचे आदेश दि. 14 एप्रिल 2021 चा मुद्दा क्र. 5 मध्ये नमूद सूट देण्यात आलेली (Exemption Category) कार्यालये एकुण कर्मचारी संख्येच्या 15 % क्षमता किंवा 5 कर्मचारी यापैकी जे जास्त असेल तेवढ्या संख्येने सुरु राहतील.



Scanned by CamScanner

c) या कार्यालयाचे आदेश दि. 14 एप्रिल 2021 चा मुद्दा क्र. 2 मध्ये नमूद अत्यावश्यक सेवांची (Essential Services) कार्यालये आवश्यकतेएवढ्याच कमीत कमी संख्येने व 50 % पेक्षा जास्त नाही एवढ्या क्षमतेने अत्यावश्यक सेवेकरिताच सुरु राहतील. प्रत्यक्ष अत्यावश्यक सेवा देणा-या कर्मचा-यांची उपस्थितीसुद्धा कमी करावी परंतु गरजेनुसार त्यांची उपस्थिती 100 % पर्यंत वाढविता येईल.

**B. विवाह समारंभ (Marriage Ceremony):-**

एका ठिकाणी एकच विवाह समारंभ आयोजित करण्यास परवानगी राहील. तसेच विवाह समारंभांना जास्तीत जास्त 25 लोकांच्या उपस्थितीमध्ये व 2 तासांचे कालावधीकरिता परवानगी राहील. या नियमांचे उल्लंघन करणा-या कुटुंबाला रु. 50000/- (पन्नास हजार रु.) दंड आकारण्यात येईल व ज्याठिकाणी असे उल्लंघन करण्यात आलेले आहे ती जागा कोविड-19 हा साथरोग म्हणून अधिसूचित असेपर्यंतच्या कालावधीसाठी बंद (सील) करण्यात येईल.

**C. खाजगी प्रवासी वाहतूक (Private Passenger Transport):-**

a) खाजगी बसेस वगळता इतर खाजगी वाहनांद्वारे प्रवासी वाहतूक करण्यास फक्त अतितातडीच्या व अत्यावश्यक सेवांकरिता किंवा वैध कारणांकरिता वाहनचालक व आसनक्षमतेच्या 50 % क्षमतेने परवानगी राहील. परंतु खाजगी बसेस वगळता इतर खाजगी वाहनांद्वारे आंतरजिल्हा (एका जिल्ह्यातून दुस-या जिल्ह्यामध्ये) व आंतरशहरी (एका शहरातून दुस-या शहरामध्ये) प्रवासी वाहतूक करु नये व प्रवासी ज्या शहरातील आहेत त्या शहरापुरत्या मर्यादेत वाहतूकीस परवानगी राहील. अत्यावश्यक सेवेकरिता किंवा तातडीच्या वैद्यकीय निकडीकरिता किंवा टाळता येणार नाहीत असे प्रसंग उदा. अंत्यविधी किंवा कुटुंबाचे गंभीर आजारपण या कारणांसाठी इतर खाजगी वाहनांद्वारे आंतरजिल्हा (एका जिल्ह्यातून दुस-या जिल्ह्यामध्ये) व आंतरशहरी (एका शहरातून दुस-या शहरामध्ये) प्रवासी वाहतूक करण्यास परवानगी राहील. या नियमाचे उल्लंघन करणा-या व्यक्तीस रु. 10000/- (दहा हजार रु.) दंड आकारण्यात येईल.

b) खाजगी बसेसना आसनक्षमतेच्या 50 % क्षमतेने प्रवासी वाहतूक करता येईल व कोणत्याही परिस्थितीत प्रवाशांना उभे राहून प्रवास करण्यास मनाई राहील.

c) खाजगी बसेसद्वारे आंतरजिल्हा (एका जिल्ह्यातून दुस-या जिल्ह्यामध्ये) व आंतरशहरी (एका शहरातून दुस-या शहरामध्ये) प्रवासी वाहतूक करताना खालील नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

   i. खाजगी बसेसच्या व्यवस्थापनांनी प्रवासादरम्यान बसचे जास्तीत जास्त दोन शहरांतील थांबे निश्चित करावेत व त्याबाबतचे वेळापत्रक संबंधित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास कळवावे. स्थानिक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास आवश्यकता वाटल्यास त्यामध्ये बदल करता येईल.

   ii. सर्व थांब्यांवर बसमधून खाली उतरणा-या सर्व प्रवाशांचे हातावर 14 दिवसांचे गृह विलगीकरणाचा शिक्का मारण्यात यावा. शिक्का मारण्याचे काम खाजगी बसेसच्या व्यवस्थापनांना करावे लागेल.

   iii. थर्मल स्कॅनरचा वापर करण्यात यावा व लक्षणे असलेली कोणतीही व्यक्ती आढळून आल्यास त्या व्यक्तीस कोरोना केअर सेंटर किंवा रुग्णालयात भरती करण्यात यावे.



Scanned by CamScanner

iv. स्थानिक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण प्रवासी थांब्यावर उतरणा-या प्रवाशांची रॅपिड अँटीजेन चाचणी (RAT) करण्यासाठी अधिकृत संस्थेची (authorized lab) नियुक्ती करु शकेल. या चाचणीची किंमत तसे निश्चित करण्यात आल्याप्रमाणे संबंधित प्रवाशी/सेवा पुरवठादार यांचेकडून घेण्यात येईल.

v. कोणत्याही खाजगी बसेसच्या व्यवस्थापनाने या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केल्यास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून संबंधितांस रु. 10000/- (दहा हजार रु.) इतका दंड आकारण्यात येईल. वारंवार असे उल्लंघन आढळून आल्यास संबंधिताची सेवा चालू ठेवण्याची अनुज्ञप्ती (License) कोविड-19 हा साथरोग म्हणून अधिसूचित असेपर्यंतच्या कालावधीसाठी रद्द करण्यात येईल.

vi. विशिष्ट भागातून आलेल्या बसेसमधील प्रवाशांना गृह विलगीकरणाचे शिक्के सक्तीने मारण्याच्या नियमामध्ये स्थानिक परिस्थितीचा विचार करुन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सूट देऊ शकेल.

**D. सार्वजनिक प्रवासी वाहतूक (Public Passenger Transport):-**

a) राज्य शासन व स्थानिक प्राधिकरणांच्या बसेसमधून आसनक्षमतेच्या 50 % क्षमतेने प्रवासी वाहतूकीस परवानगी राहील. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्रवाशांना उभे राहून प्रवास करता येणार नाही.

b) रेल्वे व सार्वजनिक बसेसद्वारे आंतरजिल्हा (एका जिल्ह्यातून दुस-या जिल्ह्यामध्ये) व आंतरशहरी (एका शहरातून दुस-या शहरामध्ये) प्रवासी वाहतूक करताना खालील नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

i. स्थानिक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे कार्यक्षेत्रात उतरणा-या प्रवाशांची तपासणी करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती स्थानिक रेल्वे विभागाचे अधिकारी/राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास सादर करावी.

ii. सर्व थांब्यांवर बसमधून खाली उतरणा-या सर्व प्रवाशांचे हातावर 14 दिवसांचे गृह विलगीकरणाचा शिक्का मारण्यात यावा. थर्मल स्कॅनरचा वापर करण्यात यावा व लक्षणे असलेली कोणतीही व्यक्ती आढळून आल्यास त्या व्यक्तीस कोरोना केअर सेंटर किंवा रुग्णालयात भरती करण्यात यावे.

iii. स्थानिक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण प्रवासी थांब्यावर उतरणा-या प्रवाशांची रॅपिड अँटीजेन चाचणी (RAT) करण्यासाठी अधिकृत संस्थेची (authorized lab) नियुक्ती करु शकेल. या चाचणीची किंमत तसे निश्चित करण्यात आल्याप्रमाणे संबंधित प्रवाशी यांचेकडून घेण्यात येईल.

iv. विशिष्ट भागातून आलेल्या बसेसमधील प्रवाशांना गृह विलगीकरणाचे शिक्के सक्तीने मारण्याच्या नियमामध्ये स्थानिक परिस्थितीचा विचार करुन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सूट देऊ शकेल.

**E.** 'Break the Chain' अंतर्गत यापूर्वी संदर्भ क्र. 4 अन्वये या कार्यालयाने निर्गमित केलेल्या आदेशांतील कोणताही मुद्दा या आदेशामध्ये नमूद करण्यात आला नसल्यास संदर्भ क्र. 4 मधील आदेश लागू होईल.



Scanned by CamScanner

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 ते 60 तसेच भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 व इतर लागू होणा-या कायदेशीर तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 22/04/2021 रोजी रात्री 08.00 पासून तात्काळ लागू करण्यात येत असून सदर आदेश दिनांक 01 मे 2021 रोजी सकाळी 07.00 वाजेपर्यंत लागू राहील. तसेच या कार्यालयाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश लागू राहतील.

(कौस्तुभ दिवेगावकर)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद.
6. अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
7. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
8. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
9. विभाग नियंत्रक रा. प. उस्मानाबाद.
10. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
11. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
13. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद.
14. उपअभियंता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, उस्मानाबाद.
15. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
16. तहसिलदार तथा व्यवस्थापक, श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर.
17. गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व जिल्हा उस्मानाबाद.
18. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/नगर पालिका/नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
19. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner